01 OCT 2022
महासत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय सेवा योजनेचे सुसंस्कार आयुष्यभर जपा

## -डी.कार्तिकेयन

कोल्हापूर, ता.२९ (प्रतिनिधी)-

**राष्ट्रीय सेवा योजनेचा सुसंस्कार आयुष्यभर जपण्यावर स्वयंसेवकांनी भर द्यावा, असे आवाहन भारत सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे क्षेत्रीय संचालक डी. कार्तिकेयन यांनी केले.**

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या तीनदिवसीय राष्ट्रीय/ राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड चाचणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय कार्यालय, पुणे, युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई आणि राष्ट्रीय सेवा योजना, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या राज्यस्तरीय शिबिराच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते. तर प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क प्रमुख डॉ. प्रशांतकुमार वनंजे प्रमुख उपस्थित होते.

श्री. कार्तिकेयन म्हणाले, राज्यभरातील विद्यापीठांमध्ये सध्या ३ लाख ५४ हजार राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक आहेत. त्यामधून मोजक्या ३८० स्वयंसेवकांना राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलनाच्या निवड शिबिरात सहभागाची संधी मिळालेली आहे. या संधीचे सोने करण्यासाठी सर्वच सहभागी स्वयंसेवकांनी शर्थीचे प्रयत्न करावेत. येथून आनंद येथील पश्चिम विभागीय शिबिरासाठी आणि तेथून राष्ट्रीय संचलनासाठी निवड केली जाईल. आपल्यातील काही जणांना ती संधी मिळणार असली तरी शिबिरार्थींनी आपल्या भावी जीवनातही राष्ट्रीय सेवा योजनेचे संस्कार जपण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनीही मार्गदर्शन केले.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेचा येथे आलेला प्रत्येक स्वयंसेवक हा आपापल्या विद्यापीठाचा सदिच्छादूत आहे. त्यांनी हे सदिच्छेचे व मानवतेचे मूल्य आपल्यासोबत सदैव बाळगले पाहिजे.

यावेळी मंचावर क्षेत्रीय कार्यालयाचे युवा अधिकारी अजय शिंदे, उन्नत भारत अभियानाचे संचालक डॉ. टी.आर. पाटील, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, महाराष्ट्र शासनाचे मंगेश खैरनार, रमेश देवकर, श्री. कारखानीस, कॅप्टन प्रशांत पाटील,कॅप्टन राहुल मगदूम उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय जायभाये यांनी केले. संदीप पाटील व डॉ.स्नेहल राजहंस यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. उमाजी पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमास राज्यभरातील २९ विद्यापीठांचे २८० एनएसएस स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी व संघ व्यवस्थापक उपस्थित होते.

लोकमत

# दूरशिक्षण केंद्र सुट्टीच्या दिवशीही राहणार सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची प्रवेश प्रक्रिया सध्या सुरू आहे. त्यामुळे सुट्टी असलेल्या दिवशीही कार्यालय सुरू राहणार आहे.

विद्यार्थ्यांसाठी केंद्राच्या मुख्य कार्यालयात मोफत बी. ए.,बी.कॉम,एम.ए., (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम, एम. एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमाची प्रवेश अर्ज भरून देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया सुरू असेपर्यंत दुसरा आणि चौथा शनिवार तसेच रविवार आणि शासकीय सुट्टी असलेल्या दिवशीही कार्यालय सुरू राहणार असल्याची माहिती उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी शुक्रवारी दिली.

लोकमत

# विद्यापीठातील २०० झाडांना बसला फटका

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : वादळी वाऱ्याचा फटका शुक्रवारी दुपारी शिवाजी विद्यापीठ परिसरातील सुमारे २०० झाडांना बसला. त्यांच्या फांद्या तुटल्याने, तर काही झाडे उन्मळून पडल्याने रस्ते बंद झाले. काही वाहनांचे नुकसान झाले. विद्युत वाहिनी तुटल्याने विजेचा पुरवठा खंडित झाल्याने काही अधिविभागांमध्ये अंधार पसरला. विद्यापीठातील भूगोल, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, नॅनो स्कूल ऑफ सायन्स, तंत्रज्ञान अधिविभाग, रसायनशास्त्र, वसतिगृहे आदी परिसरातील सुमारे २०० झाडांच्या फांद्या तुटून पडल्या. त्यामध्ये प्राणीशास्त्र अधिविभागाच्या फिरत्या प्रयोगशाळेच्या बसचे, तर नॅनो स्कूलच्या आवारातील काही विद्यार्थ्यांच्या दुचाकींचे नुकसान झाले. विद्युत वाहिनी तुटल्याने वीजपुरवठा खंडित झाला.

महासत्ता

# विद्यापीठात अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन

कोल्हापूर, ता.२९ (प्रतिनिधी)-

तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरमध्ये बारावी नंतर प्रथम वर्ष इंजिनिअरिंग प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ या विषयावरील मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे शनिवार दि. १ ऑक्टोंबर २०२२ रोजी सकाळी अकरा वाजता तंत्रज्ञान अधिविभाग मध्ये आयोजन केले आहे.

यावर्षी जाहीर झालेल्या प्रवेश प्रक्रियेचा निकाल, कॅप राऊंड, ऑप्शन भरताना व ब्रँच निवडताना घ्यावी लागणारी काळजी तसेच प्रवेश प्रक्रिया संदर्भात इतर सर्व शंकांचे निरसन करण्यासाठी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस.एन.सपली व तज्ञ प्राध्यापक यांचे मार्गदर्शन होणार आहे.

पुढारी

# शंभूराज देसाई आज कोल्हापूर दौऱ्यावर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई शनिवारी (दि.१) कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. सकाळी पावणे अकरा वाजता त्यांचे शासकीय विश्रामगृहावर आगमन होईल. यानंतर सकाळी साडेअकरा वाजता ते श्री अंबाबाईचे दर्शन घेणार आहेत. दुपारी १२ वाजता लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन केंद्राची शिवाजी विद्यापीठात ते आढावा बैठक घेणार आहेत. यानंतर मध्यवर्ती बसस्थानक परिसरातील बाळासाहेब देसाई यांच्या पुतळ्यास ते अभिवादन करणार आहेत. दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात पुतळा आढावा आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाची ते आढावा बैठक घेणार आहेत. सायंकाळी चार वाजता ते मसूर, ता. कराडकडे रवाना होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
01 OCT 2022 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेबाबत आज मार्गदर्शन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागामध्ये शनिवारी (दि. १) सकाळी ११ वाजता बारावी नंतर प्रथम वर्ष इंजिनिअरिंग प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ या विषयावरील मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

यावर्षी जाहीर झालेल्या सीईटी प्रवेश प्रक्रियेचा निकाल, कॅप राऊंड, ऑपशन भरताना व शाखा निवडताना घ्यावी लागणारी काळजी तसेच प्रवेश प्रक्रियासंदर्भात इतर सर्व शंकांचे निरसन केले जाणार आहे.